| | **Subject – मराठी** | **Model Answer**<br>**Set – 1** |
|---|---|---|

**विभाग – १: गद्य**

**पठित गद्य**

**प्र.१ अ) उताऱ्याच्या आधारे सूचनेनुसार कृती करा.**

१) आकृती पूर्ण करा.

i) निरंजन
- गुरूजींवर ठेवायचा → पहिला नंबर
- परीक्षेत आणायचा → श्रद्धा

ii) अ) निरंजनच्या वह्या - पुस्तकांचा खर्च करायचे - भडसावळे गुरूजी

ब) गोठ्यातली सारी कामे करत - निरंजन

२) ओघतक्ता पूर्ण करा.

i) घरातल्या सर्वांशी त्याने जमवून घेतले.
↓
शाळेत नाव दाखल केले.
↓
मावशीची परिस्थिती यथातथाच होती.
↓
निरंजन वार लावून जेवायचा.

ii) नागरिकांची कर्तव्ये कोणती? उत्तम नागरिक कुणाला म्हणावे ? लोकसभा म्हणजे काय ? ग्राम पंचायतीचा प्रमुख कोण असतो? साऱ्या प्रश्नांची उत्तरे त्याला धडाधड येत होती.

३) प्रत्यय ओळखून विभक्ती लिहा.

| क्र. | शब्द | विभक्ती प्रत्यय | विभक्ती प्रकार |
|---|---|---|---|
| i) | सर्वांशी | शी | तृतीया विभक्ती प्रत्यय |
| ii) | निरंजन | प्रत्यय नाही | प्रथमा विभक्ती प्रत्यय |

४) माझा भूगोल हा नावडता विषय आहे. या विषयाचा अभ्यास सर्व विषयांच्या आधी मी करायला सुरूवात करतो. पाठाचे वाचन, नकाशे समजून घेणे, त्याच्या खूणांचा सराव करणे. अश्याप्रकारे मी अभ्यास करतो.

**प्र.१ आ) पुढील उताऱ्याच्या आधारे सूचनेनुसार कृती सोडवा.**

१) (i) हळव्या मनस्थितीत अब्दुलाच्या मनात दाजीसाहेबांविषयी आलेले विचार
- तपोवनाची वसाहत मोठी व अनेक रोगी यांची दाजी-साहेबानंतर काळजी कोण घेईल?
- आयुष्य खर्ची घालून तन-मन-धनाने फुलवलेली कर्मभूमी सोडताना दाजीसाहेबांच्या मनाला दु:ख झाले असेल.

(ii) उताऱ्यात आलेल्या दोन सणांची नावे
- नवरात्र
- दिवाळी

२) पुढील संकल्पना एका वाक्यात स्पष्ट करा:

i) तन – मन – धनाने – एखादे कार्य सर्वस्व ओतून करणे.

ii) कर्मभूमी – ज्या प्रदेशात आपले कार्य बहरात येते, ती आपल्या कर्माची भूमी होय.

iii) रात्र उतरणीला लागणे – रात्र संपण्याच्या बेतात असून थोड्या वेळाने पहाट होईल, तो प्रहर

iv) भांडवल – एखादा व्यवसाय सुरु करण्यासाठी लागणारी मूळ रक्कम

३) पुढील शब्दांचे विरुद्धार्थी शब्द उताऱ्यातून शोधून लिहा:

i) दु:ख × आनंद ii) नंतर × आता iii) जुना × नवीन iv) निरोगी × रोगी


४) शन्नू ही साधीसुधी घरगुती संसारी महिला आहे आपला संसार भला नि आपले कुटुंब भले अशी तिची मनोभावना आहे. अब्दुलमियाँने चुडी विकण्याचा धंदा मन लावून करावा व चार जास्तीचे पैसे घरात आणावेत अशी तिची इच्छा आहे. म्हणून अब्दुलमियाँ करीत असलेले समाजकार्य तिला नकोसे वाटते. शेजारच्या रघुभैयाचा धंदा तेजीत चालतो नि आपला नवरा संक्रांतीला तपोवनात जातो, याविषयी ती नाराज आहे. म्हणून शन्नो सारखी अब्दुलमियाँला नवीन धंदा करण्याचे सुचवते. त्याचप्रमाणे सारखे टुमणे लावते. आपला घरसंसार व मुलगा हेच तिचे विश्‍व असल्यामुळे तेवढ्यापुरता ती विचार करते व अब्दुलमियाँने संक्रांतीला तपोवनात जाऊ नये असे म्हणते. शन्नूच्या वागण्यातून तिचा हा विचार तिच्यापुरता मर्यादित वाटतो.

**अपठित गद्य**


**प्र.१ इ) पुढील उताऱ्याच्या आधारे सूचनेनुसार कृती सोडवा.**

१) चौकटी पूर्ण करा.

(i)




(ii)




२) एका वाक्यात उत्तरे लिहा.

i) नवनवीत वस्त्रनिर्मिती करता धागा लागतो. ii) आपले घरकूल फर्निचर मुळे सुशोभित होते.

३) i) प्रतिशब्द उता-यातून शोधा. अ) तरू - वृक्ष ब) तन – शरीर

ii) पुढील शब्दांचे लिंग बदला. अ) दास - दासी ब) कवी - कवयित्री

४) 'वृक्षवल्ली आम्हा सोयरी वनचरे' ही पद्यपंक्ती संत तुकाराम महाराज यांनी लिहिली आहे आज आपण निसर्गाचा ऱ्हास झाला, पर्यावरणाचा नाश झाला असे म्हणतो पण संत तुकाराम महाराज सतराव्या शतकात सांगून गेले. संत तुकाराम म्हणतात वृक्ष, वेली हे आपले सगे सोयरे आहेत. ते आपल्याला अत्यंत उपयोगी पडतात. आपले जीवनच या निसर्गावर अवलंबून आहे. आपल्या सर्व गरजा निसर्गच पूर्ण करतो. निसर्गातील प्राणी, पक्षी, हे सर्व आपल्याला उपयोगी आहे. याच वृक्षाच्या सावलीत मनुष्य विसावतो. त्याचीच गोड फळे खाऊन क्षुधाशांती करतो म्हणून वृक्षवल्ली हे आपली सोयरी आहेत.

**विभाग – २ : पद्य**

**प्र.२ अ) कवितेच्या आधारे सूचनेनुसार कृती करा.**

१) चौकटी पूर्ण करा.

i) धानस्थ ii) ऋषिसारखं मौन व्रत घेतलेले. iii) तपश्चर्या करणारं iv) निमूटपणे मुळावरचा घाव सहन करणारे.

२) सूचनेनुसार कृती करा.

i) शरीरभर विरघळतो हिरवा रंग रक्त होते क्षणभर हिरवेगार

ii) आयुष्य होतं नुकत्याच खुडलेल्या फुलासारखं टवटवीत

३) झाड आणि माणसं निसर्गाचे घटक आहेत. झाडाचे मानवी जीवनातील स्थान महत्त्वाचे आहे. झाड निस्वार्थी भावनेने फळ, फुले, पाने, लाकूड सगळयांना देत असतो. पानगळीनंतरही नव्या उमेदीने बहरत असतो. प्रत्येक ऋतूचा आनंद माणसांना देत असतो. झाडाचे चांगले गुण माणसाने घेतले पाहिजेत. झाड माणसाचा खरा मित्र आहे. मनुष्याच्या आयुष्यात झाडाचे खूप महत्त्व आहे.

४) हिरवगारं झाडासारखं या कवितेत कवी जॉर्ज लोपीस यांनी सांगितले आहे. झाडावरची पाने जशी उत्साहाने सळसळतात व तसेच माणसांनीही खळखळत हसले पाहिजे व आपल्या जीवनात आनंद निर्माण केला पाहिजे.

**प्र.२ आ) दिलेल्या मुद्द्यांच्या आधारे कोणत्याही एका कवितेसंबंधी खालील मुद्द्यांना अनुसरुन कृती सोडवा.**

**प्र.२ इ) खालील ओळींचे रसग्रहण करा.**

सुप्रसिद्ध कवयित्री, कथाकार ललित लेखिका ‘इंदिरा संत’, विशुद्ध भावकविता लिहणारी व कवयित्री म्हणून तत्कालीन समीक्षकांनी इंदिरा संत यांच्या कवितेला मुक्त दाद दिली आहे. सीमेवर लढायला जाण्यासाठी सुसज्ज झालेल्या जवानाला साऱ्या देशवासीयांकडून केले जाणारे हे औक्षण आहे औक्षण करताना मनात येणाऱ्या विविध भावनाचे वर्णन कवयित्रीने औक्षण या कवितेत केले आहे सीमेवर लढाईला जाणारा जवान सज्ज आहे. त्याचे शौर्य पराक्रम थोर आहेत . त्यापुढे जीव ओवाळून टाकला तरी कमीच आहे सैनिकाच्या कार्याचा अभिमान बाळगणारे देशवासीय डोळयांतील ज्योतींनी त्याचे औक्षण करून त्याचा रक्षणाची जणू प्रार्थनाच करीत आहेत. वीररस येथे वापरला आहे. कवयित्रीची निवेदनात्मक भाषाशैली दिसून येते .

## विभाग – ३: स्थूलवाचन

**प्र.३ पुढीलपैकी कोणत्याही दोन कृती सोडवा.**

१)

| | |
|---|---|
| **सूर्यः** | मी आता अस्ताला जाणार सर्व विश्व अंधारात बुडणार. |
| **पणतीः** | हे शक्तीशाली तेजस्वी सूर्य देवा मी विश्वाला प्रकाशित करेन. |
| **सूर्य :** | माझ्या इतका प्रकाश आहे तुझ्याकडे ? |
| **पणती :** | तुझ्याइतका प्रकाश नाही माझ्याकडे तरीही मी हार मानणार नाही |
| **सूर्य :** | तू अंधाराला हरवशील ? |
| **पणती :** | हो, मी प्राण पणाला लावेन जो पर्यंत सकाळ होत नाही तोपर्यंत मी जळत राहीन; हे वचन सूर्य देवा मी तुला देते. |
| **सूर्य :** | खूप समाधान वाटले. एवढी छाती असून सुद्धा मोठी जिद्द आहे तुझ्याकडे मी आता निर्धास्त होऊन अस्ताला जातो. |
| **पणती :** | ठीक आहे. मी पृथ्वीला प्रकाशित करण्याचे काम करते. |

२)

| शब्द अनेक | अर्थ एक |
|---|---|
| सदन, गृह, भवन, निकेतन | घर |
| सरिता, तटिनी, तरंगिणी | नदी |
| कर | हात , महसूल |
| वार | दिवस , घाव |

३) वाळवंटी प्रदेश म्हणजे ठणठणीत कोरडेपणा, पाण्याचे दुर्भिक्ष आणि रेताड जमीन. या तीन गोष्टी जेथे एकत्र येतात तेथे जीवन फुलणे अशक्य; पण निसर्ग हा मोठा जादूगार आहे. वाळवंटी प्रदेशातही खास जादूगार आहे. वाळवंटी प्रदेशातही खास तेथील अशी जीवसृष्टी आहे ; वनस्पती आहेत आणि या वनस्पतींवर जगणारे प्राणी आहेत. पाण्याखेरीज वनस्पती व प्राणी जगू शकत नाहीत हे तर खरेच ; पण वाळवंटी प्रदेशांना थोडेसे का होईना पाणी मिळते आणि निसर्गाची आणि निसर्गाची बहादुरी अशी, की या थोड्याशा पाण्यावर तो येथे वनस्पती फुलवतो आणि तेथले प्राणी जगवतो. वाळवंटातील जीवनसृष्टी हा खरोखर पृथ्वीवरचा एक चमत्कार आहे. वाळवंटी प्रदेशात वर्षातून एखादाच पाऊस पडतो कधी तर दोन - दोन, तीन - तीन वर्षे पावसाचा ठिकाणा नसतो. अवकर्षणाच्या या प्रदीर्घ काळात हा प्रदेश अतिशय वैराण व रूक्ष दिसतो. मग एक दिवस पाऊस पडतो आणि एखादी जादू व्हावी त्याप्रमाणे झाडाझुडपांना पालवी फुटते आणि जमिनीत दीर्घकाळ सुप्तावस्थेत पडून राहिलेल्या बियांमधून रोपे वर येतात. रोपांवर भरगच्च फुले फुलतात. मरूभूमीचे नंदनवन होते; हे वैभव पहात पडणा-या स्वप्नाप्रमाणे काही काळ टिकणारे असते. म्हणून निसर्गाला जादूगर म्हटले आहे.

## विभाग – ४: भाषाभ्यास

**प्र.४ अ) व्याकरण घटकांवर आधारित कृती.**

१) सामासिक शब्द व समासाच्या जोडया लावा :

| सामासिक शब्द | | समास | |
|---|---|---|---|
| i) | दिवसोंदिवस | अ) | अव्ययीभाव |
| ii) | आतबाहेर | ब) | वैकल्पिक द्वंद्व |
| iii) | चौरंग | क) | व्दिगू |
| iv) | साफसाफई | ड) | समाहार द्वंद्व |

२) अलंकार

i) अलंकार - उपमा ii) उपमेय - मेनका iii) उपमान – चंद्र iv) साम्यवाचक शब्द – सम

३) वाक्याचे प्रकार लिहून वाक्याचे रूपांतर करा.

| | वाक्य | वाक्याचे प्रकार | रूपांतर |
|---|---|---|---|
| i) | या जगात त्यांच कुणी होतं का ? | प्रश्नार्थी वाक्य | या जगात त्याचं कुणीही नव्हते. |
| ii) | गुरूजींचे निरंजनवर खूप प्रेम होते. | विधानार्थी | किती प्रेम होते निरंजनवर गुरूजींचे ! |

४) खालील शब्दांचे सामान्यरूप व विभक्ती प्रत्यय लिहून तक्ता पूर्ण करा.

| | शब्द | सामान्यरूप | प्रत्यय |
|---|---|---|---|
| i) | स्वच्छतेची | स्वच्छते | ची |
| ii) | कार्यक्रमाला | कार्यक्रमा | ला |

५) खालील वाक्प्रचाराचा वाक्यात उपयोग करा.

i) क्रोध येणे - संतोषने सांगितलेले काम न केल्यामुळे बाबांना क्रोध आला.

ii) उलटतपासणी - पोलिसांनी पकडलेल्या चोराची उलटतपासणी केली.

**प्र.४ आ) भाषासौंदर्य**

१) शब्दसंपत्ती

i) विरुद्धार्थी शब्द लिहा.

अ) परिचित × अपरिचित ब) प्रत्यक्ष × अप्रत्यक्ष

ii) शब्दसमुहाबद्दल एक शब्द लिहा.

अ) विद्या शिकणारा - विद्यार्थी ब) आठ दिवसांचा कालावधी - आठवडा

iii) एका शब्दाचे अनेक अर्थ लिहा.

अ) दीन – गरीब ब) दिन – दिवस

iv) शब्दांतील अक्षरांपासून दोन अर्थपूर्ण शब्द बनवा.

शैशवसंगीत - शैशव, सांगीत, गीत, संत, शव, शत

२) i) अचूक शब्द ओळखा.

लोकप्रीय, लोकप्रिय, लोकप्रिय, लोगप्रिय – लोकप्रिय

ii) लेखननियमांनुसार बदल करा.

परवा सुट्टी काढून घराकडे गेलो होतो.

३) i) विरामचिन्हांचा योग्य वापर करा.

तू का थापा मारतोस ? अभ्यास का नाहीस केलास ?

ii) चुकीची विरामचिन्हे बदला.

किती सुंदर गाव आहे हे !

४) खालील शब्दांना पारिभाषिक शब्द ओळखा व लिहा.

i) Honorable – माननीय

ii) Handbill – हस्तपत्रक

५) आर्थिक, वार्षिक, मार्मिक, धार्मिक

**विभाग – ५: उपयोजित लेखन**

**प्र.५ अ) पत्रलेखन**

दि. २० जून, २०१६

प्रति,

माननीय व्यवस्थापक,

चॅम्पियन स्पोर्टस् ,
जलाराम नगर, अमरावती.
विषय: हॉकीच्या क्रीडासाहित्यावर सवलत न दिल्याबद्दल तक्रार.
सन्माननीय महोदय,
मी आदर्श शाळेचा विद्यार्थी प्रतिनिधी आपणास कळवू इच्छितो की, माझ्या दिनांक ११ जून २०१६ च्या पत्रानुसार आपण क्रीडासाहित्य शाळेत पोहोचते केले, त्याबद्दल धन्यवाद!
आपल्या दुकानाच्या जाहिरातीमध्ये खेळाडूंसाठी आकर्षक सवलत असे म्हटले होते. त्यामुळे आम्ही आमची मागणी न नोंदवता, मी व माझ्या संघातील अन्य सदस्य शाळेच्या हॉकी संघात असल्याचे प्रमाणपत्र पाठवले होते. ही बाब विचारात न घेता, आपण आम्हांस संपूर्ण रकमेचे बिल पाठवले आहे. याचे आम्हांस वाईट वाटते.
तरी कृपया या सवलतीबाबत पुनर्विचार व्हावा, ही विनंती.
कळावे,
आपला कृपाभिलाषी,
य.र.ल.
विद्यार्थी प्रतिनिधी
आदर्श शाळा,
४५, रुईकर कॉलनी,
सुमनगर, अमरावती.
abc@gmail.com

२) वृक्ष आपले गुरु आहेत. त्यांचाकडून निस्वार्थीपणा, परोपकार, त्याग हे गुण शिकावेत. ते आपल्या आरोग्याची व उदरभरणाची काळजी करतात. सर्दीपडशापासून ते कॅन्सरसारखा रोगांवर वनस्पतींपासून औषधे मिळतात. वृक्ष जमिनीत ओलावा धरून ठेवतात, वृक्षांमुळे जमिनीची धूप थांबते, पाऊस पडतो, थंडावा मिळतो शिवाय नवनवीन वस्त्रनिर्मितीकरता लागणारा धागा सुद्धा ह्यांचा पासून बनतो. म्हणजे आपल्याला रंगीबेरंगी वस्त्रांनी नटवण्यात, घरकुल नटवण्यात ह्यांचाच वाटा. केसात माळायला फुले देखील ह्यांचीच देणगी. एवढेच कशाला, पाण्यात बुडणा-या माणसाला मिळणारा काठीचा, फळीचा आधार तोही ह्यांचाच. तात्पर्य काय? माणूस हा वृक्षाच्या आधाराशिवाय कसा जगेल ? शरीरातून हृदयच काढून टाकल्यासारखे नाही का ते ? आणि तोडण्यासाठी कुऱ्हाड लाकडाची, म्हणजे वृक्ष हवाच!

**प्र.५ आ) पुढील कृती सोडवा.**

१) १) आकृती पूर्ण करा:

i) नाटिकेचा प्रकार → धमाल विनोदी नाटिका

ii) सुशांत शर्मा → नाटकाशी संबंधित भूमिका → लेखक

२) नाटकाची वैशिष्ट्ये
- उन्हाळी सुट्टीत प्रयोग
- विनोदी नाटिका
- लकी ड्रॉ
- मोफत शो

३) जाहिरातीतील यमक जुळणारे शब्द लिहा:

यमक जुळणारे शब्द → यथा → तथा

यमक जुळणारे शब्द → राजा → प्रजा

४) फक्त नाव लिहा:

आयोजक संस्था → बालरंगभूमी

२) माणसे सैरावैरा पळू लागली. दरवाजातून बाहेर पडण्यास जो तो धडपडत होता. रिनाचे आई-बाबाही घाबरले. त्यांनी रिनाला ओढतच घाईघाईने बाहेर पडायचा प्रयत्न केला. रिना धाडसी होती. तिने प्रसंगावधान राखले. तिच्याकडे मोबाईल होता. तिने एक शून्य शून्य ला कॉल लावला आणि घडलेली हकिकत थोडक्या शब्दांत पोलिसांना सांगितली पोलीस स्टेशन बाजूलाच होते. आईबाबा 'चल' सांगत असतानाही रिना धैर्य एकवटून तिथेच आडोशाला थांबली. तिने गर्दीत जायचे ही टाळले. वाघाचा धुमाकूळ सुरूच होता. पाचच मिनिटांत पोलीस हजर झाले. सोबत वाघ जाळ्यात पकडणारे पथक आणले होते. पोलिसांनी माणसांना सुखरूप बाहेर काढले आणि पथकाने आपले काम नीट बजावले. वाघ पिंजऱ्यात अडकला. सगळ्यांनी सुटकेचा नि:श्वास टाकला.

पोलिसांनी रिनाच्या धाडसाचे कौतुक केले. शाळेतही रिनाला सर्व शिक्षकांनी व सर्व मित्रमैत्रिणींनी शाबासकी दिली. दुसऱ्या दिवशी रिनाच्या धाडसाचा वृत्तान्त वर्तमानपत्रात झळकला.

**प्र.५ इ) पुढील लेखनप्रकारांपैकी कोणतीही एक कृती सोडवा. (शब्दमर्यादा १०० ते १२० शब्द)**

१)

माझी भारतभूमी

माझ्या भारतमातेला फार मोठी वैभवशाली परंपरा आहे. भारताची प्राचीन संस्कृतीही महान आहे. भारत हा वीरांचा देश आहे. प्राचीन युगात भारत ही सुवर्णभूमी होती, ज्ञानभूमी होती. जगातील वेगवेगळया देशांतून माणसे येथे ज्ञान संपादन करण्यास येत होती. प्राचीन काळी तत्त्वज्ञान, अध्यात्म यांची भूमी म्हणून भारताला मान होता.

अध्यात्म, आयुर्वेद, गणित आणि विज्ञान या क्षेत्रांतील अनेक मूलभूत गोष्टी भारताने जगाला दिल्या आहेत.

निसर्गही माझ्या भारतभूवर प्रसन्न आहे. गंगा, यमुना, गोदावरी, कावेरी इत्यादी नद्यांनी भारतभू सुजलाम् केली आहे. त्यामुळे येथे सृष्टीची विविध रूपे पाहायला मिळतात. भव्य हिमालय आम्हांपुढे उदात्ततेचा व महानतेचा आदर्शच उभा करतो. भारताच्या तिन्ही बाजूंना महासागर पसरलेला आहे. तो आमच्या मनाला विशालता देतो. भारतभूमी ही वृक्ष, पाने, फुले व फळे यांनी समृद्ध आहे.

अशीच विविधता भारतभूमीतील माणसांत आहे. भिन्न भाषा, भिन्न धर्म, भिन्न पंथ, भिन्न विचार यांनी भारतीय संस्कृती सजलेली आहे. 'विविधतेत एकता' हे भारतीय संस्कृतीचे स्वरूप आहे. भारतात विविध भाषा बोलल्या जातात आणि या विविध भाषांतील साहित्यही समृद्ध आहे. भारतातील अनेक भाषांचा उगम असलेली संस्कृत भाषा ही आमची प्राचीन भाषा आहे. या भाषेत रामायण, महाभारत यांसारखे महान ग्रंथ निर्माण झाले आहेत. भगवद्गीता आजही जगाला मार्गदर्शक ठरत आहे. भारताच्या स्वातंत्र्याच्या लढ्याची कहाणीही जगाला स्फूर्तिदायक

आहे. भारतात हरित क्रांती, श्वेत क्रांती आणि औद्योगिक क्रांती झाली. भारत कोणत्याही क्षेत्रात मागे राहिला नाही. आजच्या संगणक युगातही भारताने आपले स्थान निर्माण केले आहे. म्हणूनच मी अभिमानाने म्हणू शकतो की, माझी मायभूमी ही स्वर्गापेक्षाही श्रेष्ठ आहे.

*This question paper is for practice purpose only